ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचे सिहावलोकन

डॉ. रंजना वि. तिजारे,
सहाय्यक प्राध्यापिका
श्री. वसंत शिक्षण महाविद्यालय नागपूर

**संक्षेप** :– 'स्वावलंबन हेच आमचे ब्रिद' हे संपूर्ण महाराष्ट्राला ठनकावून सांगणा–या व महाराष्ट्राच्या कानाकोप–यात शिक्षणाची गंगा सदोदित प्रवाहित ठेवणाया समाज सुधारकामध्ये डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा बोलबाला अजूनही तेवढाच लोकप्रिय आहे. ' कमवा आणि शिका ' या तत्वाचा पुरस्कार त्यांनी केला होता. कोणासमोर हात न पसरविता, स्वतःच्या सामर्थ्यावर शिक्षण घ्या असे ते म्हणायचे प्रस्तुत संशोधनपर लेखात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा, त्यांच्या स्वातंत्र्य, समता, स्वावलंबन, श्रम प्रतिष्ठा या चतु:सुत्रीचा व त्यांनी स्थापण केलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचा आढावा घेतलेला आहे कोणत्याही फळाची अपेक्षा न करता तसेच कुठेलाही अनुदानाची अपेक्षा न करता शिक्षणाचा वारसा व गंध नसतांना केवळ शिक्षणाच्या हव्यासापोटी व पोटतिडकी पोटी समाजाचे जे चित्र त्यांच्या डोळयासमोर होते त्यातून समाज जागृतीसाठी व त्यांना अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी कर्मवीरांनी जे प्रयत्न केले त्या प्रयत्नांची सपूर्ण महाराष्ट्रानी दखल घेतली अशा या थोर शिक्षणतज्ञांच्या कार्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त वाटते. पंजाबराव देशमुख त्याच्या कार्याचा गुणगौरव करतांना म्हणतात,'' विद्यापीठाच्या मोठमोठया पदव्यानीच केवळ माणसाचे मोठेपण व कर्तुत्व यांचे मोजमाप होत नाही. या जगातील सारया विद्यापीठाच्या सार्वेच्च पदव्या कर्मवीरांच्या अंगावरून ओवाळून टाकल्या तरी त्यांच्या सेवेचे व कार्याचे खरे मूल्यमापन होणार नाही.

**बीज शब्द** :– कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य, सिंहावलोकन, रयत शिक्षण संस्था, शैक्षणिक तत्वज्ञान.

**प्रस्तावना** :– महाराष्ट्राला अनेक थोर संत, शिक्षणतज्ञ, समाज सुधारकांची परंपरा लाभली आहे. स्वातंष्य प्राप्ती पूर्वी अनेक शिक्षण तज्ञांच्या आणि समाज सुधारकांच्या विचारांनी महाराष्ट्रातील तमाम मराठी माणसाच्या मनात स्वातंत्र्याची प्रेरणा निर्माण केली. महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजन समाजाच्या मनात क्रांतीची ज्योत तर पेटवलीच पण त्याच बरोबर शिक्षणाचे बीज प्रत्येक व्यक्तीच्या मनामनात पेरण्याचे काम केले. याच तज्ञांच्या विचारांची प्रेरणा व वारसा घेऊन शिक्षणाची धुरा आपल्या खांदयांवर घेणारे समाजसुधारक व शिक्षणतज्ञ म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील. महाराष्ट्राच्या कानाकोप–यात प्राथमिक शिक्षणापासून तर उच्च शिक्षणापर्यंत शिक्षणाची पताका सतत पडकवत ठेवण्याचा मान जर कुणाला मिळाला असेल तर तो भाऊरावांना. त्यांच्या या कार्यामूळेच त्यांना कर्मवीर या पदवीने संबोधले जाऊ लागले आणि म्हणूनच यशवंतराव चव्हान त्यांच्या कार्याविषयी गौरवोद्‌गार काढतांना म्हणतात, ''कर्मवीर ही व्यक्ती नव्हती ती एक संस्था होती. बहुजन समाजाचा ज्ञानाचा प्रकाश पसरविण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले व महाराष्ट्रात नवयुग निर्माण केले. त्यांची रयत शिक्षण संस्था म्हणजे महाराष्ट्रात नवजीवन ओतणारी गंगा आहे.

**जीवनदर्शन** :– कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म 22 सप्टेंबर 1887 रोजी कोल्हापूर जिल्हयातील कुंभोज या गावी वडील पायगोंठा पाटील व आई गंगाबाई यांच्या पोटी झाला इयत्ता 6 वी पर्यंत शिक्षण कोल्हापूरात जैन बोर्डिगमध्ये झाले तेथील कडक शिस्तीमूळे ते तीथे फार काळ रमले नाही व शिक्षणाला रामराम ठोकला. परंतु शिक्षणाची उर्मी मनात कायम घर करून होती. काही दिवस किर्लोस्कर कपंनीत नौकरी केली कारखानदारांनी आपल्या नफयाचा काही भाग कामगारांवर व त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर खर्च करावा असे त्याचे मत होते. यातून मतभेद निर्माण झाले व त्यानी नौकरीचा रामराम ठोकला. गरिबीमूळे, अज्ञानामूळे समाजाची कशी पिळवणूक होते हे त्यांनी जाणले व ' शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' या महात्मा फुल्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन स्वतःला शिक्षण प्रसाराच्या कार्याला वाहून घेतले.

**शैक्षणिक कार्याची सुरूवात** :– राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांचा त्यांच्यावर अधिक प्रभाव होता. शाहू महाराजांच्या सहवासामुळे बहुजन समाजाविषयी फार तळमळ कर्मवीर भाऊरावांत निर्माण झाली होती. त्याचप्रमाणे महात्मा ज्योतीबा फुले हे त्यांचे स्फूर्तीस्थान होते. समाजोध्दाराचे कार्य भाऊरावांनी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सहवासामुळे हाती घेतले. राजर्षी शाहू महाराजांना भाऊराव गुरू मानत होते. त्यावेळी सत्यशोध ँएक समाजाची चळवळ जोरदार चाललेली होती. काले या गावी इ.स.1919 मध्ये सत्यशोधक समाजाची परीषद भरलेली होती. त्यावेळी या परिषदेत कर्मवीरांनी सातारा जिल्हयातील ग्रामीण शिक्षणासंबंधी विचार मांडला. या परीषदेत कर्मवीरांनी

सातारा जिल्हयातील काले या गावी ग्रामीण शिक्षण संस्था स्थापन करण्याचे ठरले. तीच ही 'रयत शिक्षण संस्था' होय. सर्व जातीजमातींच्या मुलांना तसेच सर्व धर्माच्या मुलांना सामावून घेणारी ही भरतातील पहीलीच शिक्षण संस्था होय.

**शैक्षणिक तत्वज्ञान** :— कर्मवीरांचे शिक्षण विषयीचे विचार त्यांच्या जीवनानुभवातुन व सामाजीक परिस्थीतीच्या विचारातून निर्माण झालेले आहेत. त्यांच्या जीवनाच्या तत्वज्ञानातूनच शिक्षणाचे तत्वज्ञान उदयास आले. कारण त्यांच्या म्हणण्यानूसार शिक्षणाची ध्येय आणि जीवनाची ध्येय परस्परांशी सुसंगत असतात. गरीब व बहूजन समाजाच्या उध्दारासाठी शिक्षणाची आवश्यकता त्यांना वाटली. पण शिक्षण घेण्यासाठी गरिबांजवळ पैसे कुठून असणार ? म्हणून शिक्षणाच्या आड गरिबी येता कामा नये, असा विचार त्यांनी मांडला ? या सर्वाच्या विचारातून त्यांचे शैक्षणिक तत्वज्ञान निर्माण झाले.

**शैक्षणिक तत्वज्ञानाची वैशिष्टे** :—

**1) स्वावलंबन** :— 'स्वावलंबी शिक्षण ' हे कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे पहिले वैशिष्टय होय. कर्मवीरांना भिक्षा मागून शिक्षण घेणे किंवा दुस—यांच्या भरवश्यावर शिक्षण घेणे मुळीच मान्य नव्हते. विद्यार्थ्यांनी स्वबळावर श्रम करून स्वावलबनाने शिक्षण घ्यावे असे ते म्हणत. याबददल ते म्हणतात '' अरे देवाने तुम्हाला दोन हात दिले आहेत, धडधाकट प्रकृती दिली आहे. काम करा, घाम गाळा व त्यांच्या मोबदल्यात शिक्षण घ्या. यावरून स्वावलंबी शिक्षणाविषयी त्यांना कीती अभिमान वाटतो हे दिसून येते. ' स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद'. हे शिक्षणाचे घोषवाक्य त्यांनी सांगीतले.

**2) स्वाभिमान** :— कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचे दुसरे वैशिष्टये म्हणजे स्वाभिमान होय. कर्मवीरांना अन्यायाबद्दल फारच चीड होती. स्वतःच्या भरवश्यावर, श्रमावर, प्रयत्नावर त्यांनी आपल्या प्रचंड अशा कार्याची उभारणी केली. मोडेन पण वाकणार नाही. जीवनात तडजोड करणार नाही असा त्यांच्या बाणा होता. आपल्या विद्यार्थ्यांने कुणापुढे मदतीसाठी हात पसरू नये कोणाची लाचारी पत्करू नये असे त्यांना वाटे. स्वाभिमानाने, स्वप्रयत्नाने, स्वतःच्या हिमतीने शिक्षण पूर्ण करावे आणि जगात प्रतिष्ठेने उजळमाथ्याने वागावे अशी त्यांची शिकवण होती. त्यांचा प्रमुख गूरूमंत्र स्वाभिमान व स्वावलंबी हा होता. स्वाभिमानाने जगावे व शिक्षण पुर्ण करावे असे ते म्हणत.

**3) स्वातंत्र्य** :— स्वावलंबणासाठी व स्वाभिमानाने जगण्यासाठी स्वातंत्र्य आवश्यक असते. स्वावलंबी, स्वाभिमानी माणसे स्वातंत्र्यप्रेमी असतात. त्यांना पारतंष्यात जगणे आवडत नाही. विद्यार्थ्यांच्या स्वतंष्य विचार बुध्दीच्या विकास त्यांनी केला. स्वतंत्र्य विचारसरणी हे शैक्षणिक तत्वाज्ञानो महत्वाचे वैशिष्टये होय. श्रमातून, स्वावलंबनातुन स्वतंशता हा गूण विद्यासर्थ्यांमध्ये प्रस्थापित करण्याचे महान असे कार्य भाऊरावांनी केले.

**4) समतेचे तत्व** :— आपल्या रयत शिक्षण संस्थेच्या शाहू बोर्डिंगमध्ये समाजातील सर्व जाती धर्माच्या लोकांना प्रवेश देऊन समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न कर्मवीरांनी केला. संस्थेच्या बोर्डिंगमध्ये साळी, माली, महार, मांग, चांभार, कुंभार, वैश्यवाणी, ब्राम्हण, मुसलमान, अशा सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला.

**5) श्रमप्रतिष्ठा** :—'' स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद्र '' या कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेच्या बीद्र वाक्यातच त्यांनी श्रमाचे महत्व सांगितले आहे. केवळ पस्तकी आणि शब्दनिष्ठ शिक्षण उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडवू शकत नाही, त्यासाठी व्यावसायिक शिक्षणाची गरज आहे हे कर्मवीरांनी ओळखले होते.

शिक्षणातून, श्रमापासून पळ काढणारे तरूण तयार करायचे नसुन श्रमाची प्रतिष्ठा वाढविणारे श्रमनिष्ठ, उद्योगी व होतकरू तरूण तयार करावयाचे आहेत. श्रमनिष्ठ शिक्षणापासून विद्यार्थी सहिष्णूवृत्तीचे, कृतीशील व सृजनशील बनतात. असे त्यांचे त होते.

**6) सत्यनिष्ठा** :— जीवनात सत्यप्रियतेला अत्यंत महत्व आहे. सत्यविना जीवनाचे अस्तित्व नाही. सर्वस्व गेले तरी विद्यार्थ्याने सत्यापासून ढळू नये. आकर्षक व्यक्तीमत्वासाठी सत्यवचन व सत्याची जाण आवश्यक आहे. असे कर्मवीर भाऊराव पाटील म्हणत असत.

**7) अन्यायाची चीड** :— कर्मवीरांना सामाजिक अन्यायाविषयी फार चीड होती. ते म्हणाले होते, ''सासमाजिक अन्यायाला ठेचणारा एक तरी विद्यार्थी माझ्या संस्थेत घडला तरी मी धन्य मानेन. ''अन्याय सोसण्याची मानसिकता ही गुलामगिरीला आमंत्रण आहे. अन्याय करणा—याप्रमाणे मुळपणे अन्याय सहन करणारेही तेवढेच दोशी आहेत. असे त्यांचे मत होते.

**8) वस्तिगृह यूक्त शिक्षणाचे तत्व** :— मनात शिक्षण घेण्याची इच्छा व अंगी बुध्दिमत्ता असून सुध्दा खेडयातील गरीब व होत करू विद्यार्थ्यांना शहरात राहून शिक्षण घेता येत नसे. शहरात त्यांच्या राहण्याची व्यवस्था नसल्यामुळे त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागते असे गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणप्राप्त करून

देण्यासाठी कर्मवीरांनी वसतिगृह यूक्त शिक्षणाचे तत्व आचरणात आणले.

**9) ग्रामीण भागात विद्यालयाची स्थापना** :– शिक्षणाची गंगा गरीब शेतक–यांच्या झोपडीपर्यंत पोहचविणारा भगीरथ म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील ग्रामीण भागात शिक्षण प्रसार करण्यासाठी बहुजन समाजाला शिक्षणाचा लाभ करवून देण्यासाठी त्यांनी गावोगावी शाळा स्थापन केल्या.

**10) श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण** :– कर्मवीरांनी विद्यार्थ्यांना ' कमवा आणि शिका ' हे मूलमंत्र दिले. रयत शिक्षण संस्थेत श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण देणारे हे तत्व राबविले. त्यामूळे दीन दुबळया असहाय ग्रामीण भागातील होतकरू तरूणांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त झाली.

**11) शिक्षक नेमणुकीचे तत्व** :– कर्मवीरांनी शिक्षक नेमताना तो कर्तव्यनिष्ठ, मन आणि मनगट मजबूत असलेला व बहुजन समाजाला विद्या देण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेला असावा या गोष्टीचा विचार केला. हे शिक्षक तयार करण्यासाठी त्यांनी ' सिल्वर ज्युबिली रूरल ट्रेनिंग कॉलेज '' सुरू केले.

**12) साधी राहणी उच्च विचार** :– कर्मवीर भाऊराव पाटील साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हया गांधीजींच्या विचारांचे पाईक होते त्यांनी जीवनभर अनवाणी राहुन शिक्षणप्रसाराचे व समाजसुधारणेचे कार्य केले.

प्रत्येक विद्यार्थी हा बाणेदार, जिद्दी व अन्यायाची चीड असणारा पाहीजे असा त्यांचा आग्रह होता. केवळ पोपटपंची करणारे विद्यार्थी त्यांना नको होती. ते म्हणतात. 'केवळ पोपटपंची करणारे विद्यार्थी मला तयार करावयाचे नाही. त्याकरिता माझी संस्था नाही. अन्यायाला ठोकणारा एकतरी विद्यार्थी या संस्थेत राहीला तरी मी माझ्या जिवाचे सार्थक झाले असे मानीन चारीत्र्य निर्मीती करण्यावर कर्मविरांना जास्त भर दिला होता. ते म्हणतात 'शिक्षण संस्थेतून बाहेर पडणारे विद्यार्थी सुसंस्कृत, चारित्र्यवान व जबाबदार नागरीक बनले पाहीजे तसेच हे शिकलेल्या विद्यार्थ्यांना उपदेश करतांना ते म्हणाले, 'शिकलेल्या विद्यार्थ्यांनी खेडयात जाऊन उत्तम शेती करावी, विपूल धान्य पिकवावे, अमाप उत्पन्न वाढवावे यासाठी अंगमेहनत करावी, र्निव्यसनी असावे. नविन शोध आणि तंत्र याकडे दुर्लक्ष करू नये. ज्यांना शेती नसेल त्यांनी औद्योगिक शिक्षण घ्यावे. कारकून बनण्यापेक्षा उद्योगधंदे वाढवावेत. आज उत्तम शेती करणा–यांची व औद्योगीक तंत्राची अधिक गरज आहे. यासाठी तरूणांनी पोशाखीपणा सोडून पडेल ते काम करण्याची तयारी दाखविली पाहिजे होता असे ते म्हणत असत.

**शिक्षकांविषयी कर्मवीरांचे मत** :– कर्मवीरांच्या शिक्षकांविषयी काही अपेक्षा होत्या. शिक्षक सच्छील, सद्विचारी, सदाचारी व श्रमाची प्रतिष्ठा वाढविणारा असावा असे त्यांना वाटत होते. प्राथमीक शिक्षकांविषयी यांच्यात फार आदरभाव होता. प्राथमिक शिक्षकांची जबाबदारी फार मोठी व महत्वाची आहे. याची पूरेपूर जाणीव कर्मवीरांना होती. प्राथमीक शिक्षकांना समाजात महत्वाचे स्थान मिळावे, प्रतिष्ठा मिळावी म्हणून ते प्रयत्न करीत असत. प्राथमीक शिक्षकांची आर्थिक स्थीती सुधारली पाहीजे असे. त्यांना नेहमी वाटत होते. शिक्षकाच्या कार्याविषयी ते म्हणतात, ''माझा आदर्श शिक्षक हा त्याच खेडयातला आदर्श ग्रामसेवक, आदर्श ग्राम नायक उपदेश करणारा नको तर मन आणि मनगट मजबूत असलेला, गरीब व बहूजन अज्ञसमाजाला विद्या देण्याच्या ध्येयाने प्रेरीत झालेला शिक्षक त्यांना पाहीजे होता शेवटी ते म्हणत, जनतेचा शिक्षक जनतेमधूनच निर्माण झाला पाहीजे.

**समाजोन्नतीसाठी शिक्षणाची वाटचाल** :– कर्मवीरांनी जीवनाचा अनुभव चांगल्या प्रकारे घेतला होता त्यामुळे त्यांना समाजातील अनीष्ठ चालरीती, दांभीकता, अज्ञानाची जाणीव होती समाजाला शिक्षणाव्दारे नवीन दृष्टी प्राप्त करून देण्याचे त्यांनी ठरविले. ते म्हणतात, ''बहूजन समाजामध्ये बहुसंख्येने असलेला शेतकरी व कामगार यांना ज्ञानाची संजीवनी दिल्याशिवाय खराखुरा समाजवाद देशात येणार नाही. राष्ट्राच्या उत्कर्षाचा मुळ पाया शिक्षण होय. शिक्षणाचा प्रसार जोपर्यंत बहूजन समाजापर्यंत होणार नाही तोपर्यंत राष्ट्राचे पाऊल पुढे पडणार नाही.'' व्यक्ती समाजाचा महत्वपर्ण अंग आहे. समाजाची सर्व शक्ती तीच्यावर अवलंबून आहे म्हणून व्यक्तीचा विकास जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत राष्ट्राचा विकास होणार नाही. विद्या मंदीर आणि शिक्षण संस्था केवळ पोट भरण्याची साधने राहून उपयोगाचे नाही तर ती विचारांची आणि विकासाची उगमस्थाने झाली पाहीजेत. ज्या समाजात मी जन्मलो त्या लोकांची समाजाची सेवा हे माझे शैक्षणिक पवित्र कर्तव्य आहे. असे ते म्हणत. शिक्षणातुन समाज सुधारणा, समाजोन्नती, समाज जागृती साधण्यासाठी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेण्याचे ठरविले.

**ग्राम विकास** :– भारत हा , खेडयांचा देश आहे. ग्रामीण भागातील खेडी सुधारल्या शिवाय देश सुधारणार नाही, हा गांधीजींचा दृष्टीकोण कर्मवीरांनी ठेवला होता. भारतातील खेडयांचा विकास जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत देशाचा विकास होणार नाही असे त्यांना माहीत होते त्यामुळे कर्मवीरांनी महाराष्ट्रात खेडयापाडयात शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी कर्मवीरांनी उघडया

पायांनी पायपीट करून खेडयात शाळा काढल्या. शिक्षणापासुन दूर झालेल्या समाजाला ज्ञान देऊन ज्ञानी करण्यासाठी त्यांनी खेडोपाडी पायी प्रवास करणारे हे कर्मयोगी महाराष्ट्रातील गरिब समाजाचे दैवत बनले. खेडयातील हुशार मुलांना शिक्षणांसाठी शहरात आणून त्यांच्या सुप्त शक्तींचा विकास करण्याचे काम कर्मवीरांनी केला. कर्मवीरांनी बहूजन समाजातील असे अनेक अलौकिक बुध्दिमत्ता असलेले विद्यार्थी साता–याला आणून स्वतः त्यांना शिकवले व त्यांना नवजीवन प्राप्त करून दिले. ग्रामीण भागात आता अनेक डाक्टर्स, बॅरिस्टर, वकील, प्राध्यापक, शिक्षक, समाजसेवक, आधुनिक शेतीनिष्ठ, पदवीधर दिसत आहेत. त्यांचे श्रेय कर्मवीर भाऊराव पाटील यांनाच दिले पाहीजे.

**रयत शिक्षण संस्था** :– कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाच्या प्रसाराचे महान कार्य केले त्यांत त्यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या कार्याचा उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. ग्रामीण जनतेला शिक्षणाच्या प्रवाहात आनण्यासाठी 4 ऑक्टोंबर 1919 रोजी कार्ले येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली त्यांच्यासाठी 1924 मध्ये सातारा येथे छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस हे वसतिगृह सुरू केले. शिस्त,काटकसर,श्रमप्रतिष्ठा, उद्योजकता, चारिष्य संवर्धन, संघनिष्ठा या मूल्यांचे बिजारोपक हा या संस्थेच्या स्थापनेमागचा भाऊरावांचा उद्येश होता. मागासलेल्या बहुजन समाजातील मुलांना शिक्षणाची दारे मोकळी करून ज्ञानाची गंगाच गरिबांच्या दारापर्यंत आणण्याचे श्रेय रयत शिक्षण संस्थेला जाते.'' स्वालंबनातून शिक्षण हेच आमचे ब्रीद '' हे या संस्थेचे बोधवाक्य होते. आता या संस्थेने वटवृक्षाचे रूप धारण केले आहे.

**प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था** :– कर्मवीरांना प्राथमिक शिक्षणाविषयी विशेष तळमळ होती. प्राथमिक शिक्षण हा शिक्षनाचा पाया आहे. हे त्यांनी जाणले व 16 जुलै 1935 रोजी प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी सातारा येथे ''सिल्वहर ज्युबीली रूरल ट्रेनिंग कॉलेज ''सुरू केले. व संपूर्ण महाराष्ट्रभर प्राथमिक शाळा स्थापन केल्या. प्राथमिक शिक्षणाबरोबरच त्यांनी माध्यमिक व उच्च शिक्षणालाही सुरूवात केली.

**ऐच्छिक शाळा योजना** :– ग्रामीण जनतेला आत्मनिर्भर व स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांनी ऐच्छीक शाळा योजना राबविली, शाळा व महाविद्यालयातील संकुलात ऐच्छिक शाळा योजनेची आकृतीबंधाचा पाठपुरावा केला.

**निष्कर्ष**:– ज्ञानाची गंगा घरोघरी पोहचविणारे कर्मवीर भाऊराव पाटील हे थोर शिक्षणतज्ञ, समाजसुधारक होते. शिक्षणाचा कुठलाही वारसा नसलेल्या या शिक्षण तज्ञाने आपल्या स्वातंष्य, समता,स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा या तत्वाच्या बळावर महाराष्टातील, असंख्य लोकांना अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढून प्रकाशाचा किरण दाखविला .त्यानी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. व त्याव्दारे ग्रामीण जनतेपर्यंत शिक्षणाचा प्रवाह पोहचविला सर्व जातीधर्माच्या, ग्रामीण भागातील होतकरू व शिक्षणाची तळमळ असलेल्या मुलांना एकत्र आणून त्यांनी वसतिगृहाची स्थापना केली. शिका, शिकवा व शहाणे व्हा हा भाऊराव पाटील यांचा 'मुलमंत्र' होता. स्वावलंबन, सामाजिक एकता श्रमप्रतिष्ठा, आत्मनिर्भरता, समाजसेवा या मूल्यांना त्यांनी आपल्या शैक्षणिक कार्यात महत्वाचे स्थान दिले. अखंड महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेला ज्ञानाचा मार्ग दाखविणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांचा शैक्षणिक कार्याला महाराष्ट्रातील जनता चिरकाल स्मरणात ठेवले असा आशावाद वाटतो.

*संदर्भ :–*


1) *बागुल प्रभाकर, 2007,कर्मवीर भाऊराव पाटील सुमेघ प्रकाशन, पूणे.*
2) *घोरमोडे के. यु, घोरमोडे कला (2006) शैक्षणिक विचारवंत विद्या प्रकाशन, नागपूर.*
3) *जाधव रमेश, जाने 2017 कर्मवीर भाऊराव पाटील ' साकेत प्रकाशन, औरंगाबाद*
4) *क्षिरसागर व्हि. एस, 2008 'महाराष्टातील थोर समाज सुधारक व विचारवंत,' के.सागर, प्रकाशन, पूणे.*
5) *नानकर प्रभाकर, 2008 ' आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार– कर्मवीर भाऊराव पाटील', भारतीय विचार साधना प्रकाशन, पूणे.*